**महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अधिनियम , २०२१ कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी गस्ती नौका भाडेपट्टीने घेण्याबाबत...**

महाराष्ट्र शासन
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन शुद्धीपत्रक क्रमांकः मत्स्यवि-१११५/प्र.क्र. १७४/पदुम-१४**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०९ मे, २०२३

वाचा :

१) **समक्रमांकाचा शासन निर्णय दि. २६ जुलै, २०२२**
२) **आयुक्तांचे पत्र क्र. मत्स्य/सा/०५२८०१/३४४/२०२२-२३, दि. ०८.०५.२०२३**

प्रस्तावना :

उपरोक्त वाचा अ. क्र. १ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, २०२१ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ४ गस्ती नौका भाड्याने घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच भाड्याने घेण्यात येणाऱ्या गस्ती नौकांच्या अटी, शर्ती व तांत्रिक तपशील वाचा -१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत राज्याच्या जलधी क्षेत्रात अनधिकृत एलईडी/पर्ससीन मासेमारी साहित्य वापरून मासेमारी करणाऱ्यांची संख्या वाढलेली आहे. तसेच, परराज्यातील हायस्पीड नौका यांच्याद्वारे मोठ्या प्रमाणावर घुसखोरी केली जात आहे. राज्याच्या जलधी क्षेत्रातील अनधिकृत मासेमारीस आळा घालण्यासाठी व पर राज्यातील हायस्पीड नौकांवर वचक बसविण्यासाठी आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी वाचा अ. क्र. २ येथील पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे दि. २६ जुलै, २०२२ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुद्धीपत्रक**

आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी वाचा अ. क्र. २ येथील पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे दि.२६ जुलै, २०२२ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देत आहे.

"राज्याच्या जलधी क्षेत्रात गस्त घालण्यासाठी ४ गस्ती नौका भाडयाने घेण्यास शासन मान्यता देत आहे. भाडयाने घेण्यात येणाऱ्या ४ नौकांचा कालावधी हा (५ वर्षे + १ वर्ष +१ वर्ष) असा असेल"

ऐवजी

"राज्याच्या जलधी क्षेत्रात गस्त घालण्यासाठी ४ गस्ती नौका भाडयाने घेण्यास शासन मान्यता देत आहे. भाडयाने घेण्यात येणाऱ्या ४ नौकांचा कालावधी हा (८ वर्षे + २ वर्ष) असा असेल"

**असे वाचावे.**

२. तसेच भाड्याने घेण्यात येणाऱ्या गस्ती नौकांचे तांत्रिक निकष निश्चित करण्यासाठी व त्यानुषंगाने निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी वाचा-१ येथील शासन निर्णयामध्ये नमूद आयुक्त (मत्स्य) यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीमार्फत कार्यवाही करण्यात यावी.

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३०६०७१५३२०९५९०१ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KISHOR MAHADEO JAKHATE

Digitally signed by KISHOR MAHADEO JAKHATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=83112e1445917d0a21fbab36d7c0ff41e09863c93a2e62ea1b0c01da16b7a161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=KISHOR MAHADEO JAKHATE
Date: 2023.06.07 15:33:25 +05'30'

**(किशोर जकाते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
५. प्रधान सचिव (पदुम), मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. सह आयुक्त (सागरी), मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, कोकण विभाग, मुंबई.
९. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, पालघर/ठाणे/मुंबई शहर/मुंबई उपनगर/ रायगड/ रत्नागिरी/सिंधुदुर्ग.
१०. महालेखापाल (लेखापरीक्षक/लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
११.निवडनस्ती.